# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक ०४ ऑगस्ट, २०२३ / श्रावण १३, १९४५ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **सहकार मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **महसूल, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विकास मंत्री** | |
| **(३)** | **वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री** | |
| **(४)** | **कृषी मंत्री** | |
| **(५)** | **रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री** | |
| **(६)** | **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** | |
| **(७)** | **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३२**

---

### राज्यातील शेतकऱ्यांना पीक विमा योजनेची रक्कम मिळाली नसल्याबाबत

**(१) * २०००० श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अवकाळी पाऊस, गारपीट, अतिवृष्टीमुळे व सततच्या पावसामुळे नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करुनही पीक विम्याची रक्कम अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आली नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने विमा कंपन्यांना भरपाईची रक्कम अदा करण्याचे आदेश न दिल्याने पीक विमा कंपन्यानी दोन हजार कोटी रुपयांची पीक विमा रक्कम स्वत:कडे प्रलंबित ठेवली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विमा कंपन्यांनी ७२ तासांमध्ये माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नसल्याने अनेक शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम अदा करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन, चौकशीच्या अनुषंगाने राज्यात अवकाळी पाऊस, गारपीट, अतिवृष्टी व सततच्या पावसामुळे नुकसान झालेल्या पिकांची विमा रक्कम अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) हे खरे नाही.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत खरीप २०२२ मध्ये दिनांक ११/०७/२०२३ अखेर स्थानिक नैसर्गिक आपत्ती या बाबी अंतर्गत ४३.४३ लाख शेतकऱ्यांना रुपये १९८८.६६ कोटी वाटप करण्यात आली आहे. तसेच काढणी पश्चात नुकसान भरपाई या बाबी अंतर्गत ४.५० लाख शेतकऱ्यांना रुपये ४३८.१५ कोटी वाटप करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम २०२२ मध्ये राज्यातील ९६.६१ लाख शेतकरी अर्जदारांनी सहभाग घेऊन ५७.६४ लाख हे. क्षेत्र विमा संरक्षित केले आहे. योजनेंतर्गत दिनांक ११ जुलै, २०२३ अखेर स्थानिक आपत्ती, हंगामातील प्रतिकूल परिस्थिती, काढणीपश्चात नुकसान भरपाई व पीक कापणी प्रयोगाच्या आधारे नुकसान भरपाई या बाबींतर्गत एकूण ६८.९५ लाख लाभार्थ्यांना रक्कम रुपये ३१८०.८५ कोटी इतकी नुकसान भरपाई निश्चित झाली असून त्यापैकी ६५.७९ लाख शेतकऱ्यांना रुपये ३१४८.९१ कोटी नुकसान भरपाईचे वाटप विमा कंपनीमार्फत करण्यात आले असून उर्वरित नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत किमान २० गुंठे जमीन असण्याची अट शिथील करणेबाबत

**(२) * १९७४८ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या प्रधानमंत्री कृषी सिंचन या योजनेकरीता लाभार्थीकडे २० गुंठेपेक्षा अधिक जमीन असणे आवश्यक असून, या योजनेतून तुषार व ठिबक सिंचनाकरीता ७० टक्क्यांपर्यंत एकरी २५ हजार ते ३० हजार रुपये अनुदान मिळते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात अत्यल्प भूधारकांची संख्या वाढत असून २० गुंठ्याच्या आतील भूधारक शेतकरी या योजनेच्या अनुदानापासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने यासंदर्भात निर्णय घेऊन या योजनेतील अनुदानापासून अत्यल्प भूधारक शेतकरी वंचित राहू नयेत यासाठी २० गुंठे पेक्षा जास्त जमिनीची अट शिथील करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) प्रधानमंत्री कृषी सिंचन या योजनेकरीता लाभार्थीकडे २० गुंठेपेक्षा अधिक जमीन असणे आवश्यक आहे. सदर योजनेतून तुषार व ठिबक सिंचनाकरीता अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना अनुज्ञेय खर्चाच्या ५५% अथवा प्रत्यक्ष खर्चाच्या ५५% यापैकी कमी असेल ते आणि इतर शेतकऱ्यांना अनुज्ञेय खर्चाच्या ४५% अथवा प्रत्यक्ष खर्चाच्या ४५% यापैकी कमी असेल ते अनुदान देय

आहे. तसेच मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना व अटल भूजल योजनेंतर्गत अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना २५% व इतर शेतकऱ्यांना ३०% पूरक अनुदान देऊन एकूण अनुक्रमे ८०% व ७५% अनुदान देय आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सदर योजना ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. सबब, केंद्र शासनाकडे योजनेच्या लाभाकरीता आवश्यक असलेली किमान २० गुंठ्याची अट शिथिल करुन ती १० गुंठे करुन देण्याच्या अनुषंगाने योजनेच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये सुधारणा करण्याबाबत शिफारस केली आहे.
(४) लागू नाही.

-----------------

## सोलापूर पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट पूर्ण करण्याबाबत

**(३) * १९८१४ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खरीप व रब्बी हंगामासाठी २०२३-२४ या आर्थिक वर्षात वार्षिक पतपुरवठा आराखड्यानुसार ४ हजार २०० कोटी रुपयांचे कर्ज वाटपाचे लक्षांक ठेवण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कर्जमाफी योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना तसेच एकरकमी परतफेड योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना बँका सिबील स्कोअरचे कारण देऊन पुन्हा नव्याने कर्ज देण्याबाबत टाळाटाळ करत असल्याचे लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या तक्रारीवरुन निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एकरकमी कर्जफेड योजनेत लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना नव्याने कर्ज मिळण्यासंदर्भात ठरवलेल्या लक्षांकाप्रमाणे कर्जवाटप करण्यासंदर्भात तसेच कर्जमाफी मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात सोलापूर जिल्ह्यासाठी एकूण रुपये ४२५० कोटी इतका कर्जवाटपाचा लक्षांक देण्यात आला आहे. त्यापैकी खरीप हंगामासाठी रुपये २३७८ कोटी रकमेचा लक्षांक असून दिनांक ७ जुलै, २०२३ अखेर जिल्ह्यातील एकूण ८१,०२३ शेतकऱ्यांना रुपये १२६६.१२ कोटी इतक्या रकमेचे कर्जवाटप करण्यात आले आहे. (टक्केवारी- ५३.२३%)
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लातूर येथील इतर मागास बहुजन कल्याण विभागातील प्रादेशिक उपसंचालक या पदावरील नियुक्ती प्रक्रिया रद्द करण्याबाबत

**(४) * १९९९० श्री.आमश्या पाडवी : तारांकित प्रश्न क्रमांक १७८३५ ला दिनांक २३ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागाचे विभाजन करुन सन २०१६ मध्ये इतर मागास बहुजन कल्याण विभागाची शासनाने स्थापना केल्यानंतर सदर विभागाचे कामकाज चालविण्याकरीता नवीन अधिकारी व कर्मचाऱ्यांची स्वतंत्र भरती होईपर्यंत इतर विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची तात्पुरत्या स्वरुपात प्रतिनियुक्तीने पदस्थापना करण्याबाबत शासनाने शासन निर्णय निर्गमित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २१ नोव्हेंबर, २०२२ रोजी अतिरिक्त मुख्य सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांनी निर्गमित केलेल्या शासन निर्णयात प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण प्रादेशिक विभाग या पदांकरीता सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास शिफारस करण्यात आलेल्या ५ अधिकाऱ्यांपैकी ३ अधिकारी हे उपायुक्त, जिल्हा जात पडताळणी समिती या पदावर कार्यरत असतानाही सदर ५ अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्तीने इतर मागास बहुजन कल्याण विभागात दिनांक २८ नोव्हेंबर, २०२२ रोजी पदस्थापना देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यापैकी लातूर प्रादेशिक विभागात पदस्थापना देण्यात आलेल्या एका अधिकाऱ्यावर यापूर्वीच प्रादेशिक विभागात गैरव्यवहार केल्याप्रकरणी एस.आय.टी. अथवा तत्सम प्रकारे चौकशी सुरु असतानाही सदर ५ अधिकाऱ्यांची इतर मागास बहुजन कल्याण विभागात दिनांक २८ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास प्रतिनियुक्तीने पद:स्थापना करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर एस.आय.टी. चौकशी समितीची गत काही दिवसांपूर्वीच आयुक्त, समाजकल्याण पुणे यांचेकडे बैठक झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने इतर मागास बहुजन कल्याण विभागातील प्रादेशिक उपसंचालक या पदावरील नियुक्ती प्रक्रिया रद्द करुन पुन्हा पारदर्शक पध्दतीने सदर पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

इतर मागास बहुजन कल्याण विभागातील रिक्त पदे भरण्याच्या पार्श्वभुमीवर तत्कालीन मा.उप मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १९/०४/२०२२ रोजी झालेल्या बैठकीत सामाजिक न्याय विभागाच्या जातपडताळणी समितीवर कार्यरत अधिकाऱ्यांपैकी ज्या अधिकाऱ्यांनी इतर मागास बहुजन कल्याण विभागात प्रतिनियुक्तीने नियुक्तीची इच्छुकता दर्शविली होती. अशा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीवर कार्यरत उपायुक्त दर्जाच्या तीन अधिकाऱ्यांसह एकूण पाच अधिकाऱ्यांना प्रादेशिक उपसंचालक पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्याबाबत निर्णय घेण्यात येऊन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने सेवा उपलब्ध करुन दिलेल्या अधिकाऱ्यांची या विभागातील प्रादेशिक उपसंचालक पदावर दिनांक २१/११/२०२२ च्या आदेशान्वये प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे.

(३) तत्कालीन सामाजिक न्याय विभागांतर्गत भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना व शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना या दोन योजनांमधील अनियमिततेच्या अनुषंगाने नियुक्त विशेष चौकशी पथकाने सामाजिक न्याय विभागाकडे दिनांक २३/११/२०१९ च्या पत्रान्वये सादर केलेल्या अंतरिम अनुपालन अहवालाच्या आधारे चौकशीत कोण अधिकारी जबाबदार आहेत हे अद्याप निश्चित झाले नसल्याने एस.आय.टी. चौकशीच्या अनुषंगाने अद्याप कोणत्याही अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात आलेली नाही.
(४) हे खरे नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई (जि.पालघर) तालुक्यातील कामण तलाठी कार्यालयाची दुरवस्था झाल्याबाबत

**(५) * १९००२ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई येथील कामण तलाठी कार्यालय अत्यंत जीर्ण आणि धोकादायक अवस्थेत असल्याने तेथील कर्मचारी आणि नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला असल्याची बाब दिनांक २० मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कार्यालयाची शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीत काय आढळून आले आहे आणि त्यानुषंगाने तलाठी कार्यालय अन्यत्र स्थलांतरित करण्याबाबत अथवा त्याचे नूतनीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) वसई येथील कामण तलाठी कार्यालय हे तीन बैठ्या खोल्यामध्ये आहे. सदर कार्यालयाचे बांधकाम हे जुने असल्याने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, वसई यांना स्ट्रचरल ऑडिट करुन अहवाल सादर करण्याचे दिनांक ०६/०६/२०२३ च्या पत्रान्वये कळविले आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर याबाबत जिल्हाधिकारी, पालघर यांच्यामार्फत पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आदिवासी सहकारी संस्था आर्थिक संकटात आल्याबाबत

**(६) * १९८०५ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, प्रा.राम शिंदे, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात आदिवासी शेतकरी व शेतमजुरांच्या विकासासाठी स्थापन करण्यात आलेल्या आदिवासी विकास सहकारी संस्था आर्थिक संकटात सापडल्या असून राज्यातील ७०० आदिवासी सहकारी संस्था तोट्यात गेल्या असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अवसायनात गेलेल्या संस्थांनी थकबाकीदार शेतकऱ्यांच्या सातबारावर कर्जाचा बोजा चढविल्याने आदिवासी शेतकरी अडचणीत आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या अवसायनात गेलेल्या सहकारी संस्था वाचविण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) आणि (२) अंशत: खरे आहे.

राज्यात सध्या कार्यरत असलेल्या ८८९ संस्थांपैकी २३१ संस्था नफ्यात आहेत तर ६५८ संस्था तोट्यात आहेत. कार्यरत असलेल्या व अवसायनात असलेल्या आदिवासी विविध कार्यकारी संस्थांमधील नियमित व थकीत सभासद शेतकऱ्यांच्या जमिनीवर कर्जाच्या अनुषंगाने बोजा नोंदविलेला आहे.
(३) कर्जदारांकडून कर्ज वसुली प्रभावीरित्या करण्यासाठी व त्या अनुषंगाने संबंधित संस्थेतील अनिष्ठ तफावत कमी करण्यासाठी शासन स्तरावर प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांसाठी एकरकमी कर्ज परतफेड योजनेस मान्यता देण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) लागू नाही.

-----------------

## विदर्भ आणि मराठवाडा विभागातील दुग्धविकास प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यातील प्रकल्पांच्या अंमलबजावणीबाबत

**(७) * १९६४७ प्रा.राम शिंदे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भ आणि मराठवाडा विभागातील दुग्धविकास प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यातील प्रकल्पांना गती मिळणार असल्याची माहिती मा.दुग्धविकास व पशुसंवर्धन मंत्री महोदयांनी दिली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दुग्धविकास प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यातील प्रकल्पाच्या अंमलबजावणी संदर्भात तसेच पशुसंवर्धन विषयाशी निगडित केंद्रीय रस्ते विकास मंत्री आणि केंद्रीय पशुसंवर्धन, दुग्धविकास मत्स्यव्यवसाय विकास मंत्री महोदय यांच्या समवेत मा.मंत्री दुग्धविकास व पशुसंवर्धन आणि वरिष्ठ अधिकारी यांच्यासमवेत नुकतीच बैठक घेण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील दूध इतर राज्यात विकण्यासाठी गुजरातच्या अमुल डेअरी प्रमाणे महाराष्ट्रातील दुधाच्या वाहतुकीसाठी रेल्वे टँकरचा वापर करून शेतकऱ्यांच्या दूध दरात वाढ करण्याबाबत तसेच विदर्भ आणि मराठवाडा विभागातील दुग्धप्रकल्पाचा विकास करीत असतानाच उर्वरित महाराष्ट्रातील पश्चिम महाराष्ट्र आणि खानदेश विभागातील दुग्ध व्यवसायांना नुकसान सोसावे लागत असून दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांच्या दुधाला किमान वाजवी दर देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) राज्यातील दुग्ध उत्पादकांना वाजवी दर मिळावे यासाठी शासन निर्णय, क्रमांक-एमएलके-२०२३/ प्र.क्र.६३/ पदुम-८, दिनांक २७ जून, २०२३ अन्वये दूध खरेदी दर निश्चित करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील लोककलावंतांना शासनाने जाहीर केलेले पुरस्कार प्रदान करण्याबाबत

**(८) * १९६१० श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील लोककलावंताना शासनाकडून दिला जाणारा पुरस्कार सोहळा माहे एप्रिल, २०२२ मध्ये पुढे ढकलण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुरस्कारांमध्ये विविध कला प्रकारातील १२ लोककलावंतांचा समावेश असून माहे डिसेंबर, २०२२ मध्ये नागपूर येथे व दिनांक १७ मार्च, २०२३ रोजी मुंबई येथे पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात येऊनही लोककलावंतांना पुरस्कार प्रदान करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने जाहीर केलेल्या पुरस्कारांपैकी, शासनाच्या इतर खात्याशी संबंधित विठाबाई जीवन गौरव पुरस्कार व महाराष्ट्र भूषण पुरस्कार हे दोन पुरस्कार वितरण कार्यक्रम यापूर्वीच पार पडल्यामुळे, सामाजिक न्याय विभागामार्फत देण्यात येणाऱ्या पुरस्कारांबाबत लोककलावंतामध्ये संशयाचे वातावरण निर्माण झाल्याचे माहे मे, २०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दिनांक २२ एप्रिल, २०२२ पासून प्रलंबित असलेले तसेच सन २००९ मध्ये देखील शासनाने जाहीर केलेले पुरस्कार लोककलावंताना अद्याप न देण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जाहीर केलेले पुरस्कार लोककलावंतांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

(२) नाटक, कंठसंगीत, उपशास्त्रीय संगीत, वाद्यसंगीत, मराठी चित्रपट, कीर्तन/समाजप्रबोधन, तमाशा, शाहिरी, नृत्य, लोककला, आदिवासी गिरीजन आणि कलादान या क्षेत्रांमध्ये ज्या कलाकारांनी प्रदीर्घ काळ सेवा केलेली आहे. अशा कलाकारांना "राज्य सांस्कृतिक पुरस्कार" प्रदान करुन सन्मानित करण्यात येते. सदर पुरस्कार हा माहे डिसेंबर, २०२२ मध्ये नागपूर येथे पुरस्कार्थींना प्रदान करण्याचे प्रस्तावित होते. मात्र अधिवेशन कालावधीतील कामकाजामुळे सदरहू पुरस्कार आयोजन हे पुढे ढकलण्यात आले होते, ही वस्तुस्थिती आहे. सदर पुरस्कार हा दिनांक १० एप्रिल, २०२३ रोजी सर्व सन्मानर्थींना सन्मानपुर्वक प्रदान करण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) अद्यापपर्यंत जाहीर करण्यात आलेले सर्व पुरस्कार प्रदान करण्यात आलेले असून कोणतेही पुरस्कार प्रदान करण्याचे बाकी नाही.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदगांव पेठ (जि.अमरावती) येथील वाघळी नदीच्या पात्रामध्ये अवैधरित्या बांधकाम करण्यात येत असल्याबाबत

**(९) * १९४५९ श्री.प्रविण पोटे-पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगांव पेठ (जि.अमरावती) येथील वाघळी नदीचे पात्र कमी करून विनापरवानगी अवैध बांधकाम करण्यात येत असल्याची बाब माहे मे, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त अवैध बांधकाम करणाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) मौजा नांदगांव पेठ, जि.अमरावती येथील सर्व्हे नं. १२ ला लागून वाघळी नाल्यावर अवैध बांधकाम करण्यात आल्याचे निर्देशनास आले आहे.
(२) मौजा नांदगांव पेठ, जि.नंदुरबार येथील सर्व्हे नं. १२ ला लागून वाघळी नाल्यावर करण्यात आलेले अवैध बांधकाम निष्काषित करण्याबाबत व अवैध बांधकाम करणाऱ्यांवर नियमानूसार कारवाई करण्याबाबत क्षेत्रिय कार्यालयामार्फत कार्यवाहीत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुक्ताईनगर (जि.जळगाव) तालुक्यातील सातबारा वरील दुरुस्तीची शेकडो प्रकरणे विविध स्वरूपाच्या त्रुटी काढून प्रलंबित ठेवल्याबाबत

**(१०) * २०१२२ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुक्ताईनगर (जि.जळगाव) तालुक्यातील सातबारा वरील पोट खराब दुरुस्तीकामी उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयातील कर्मचाऱ्यांने सुधारित आकारणी अभिप्राय देण्यासाठी पैशाची मागणी केली असून पैसे न दिल्यास विविध स्वरूपाच्या त्रुटी काढून जवळपास ५०० प्रकरणे अपात्र करण्यात आल्याची तक्रार मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २८ मे, २०२३ रोजी मा.जिल्हाधिकारी, जळगाव यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुंषगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) तहसिलदार, मुक्ताईनगर यांचेकडून पोटखराब क्षेत्र लागवडीखाली आल्याने सदर क्षेत्रावर आकारणी करण्याबाबत उप अधीक्षक भूमी अभिलेख, मुक्ताईनगर यांचेकडे प्राप्त एकूण ५६३ प्रस्तावांमध्ये रस्ता, झुरी, टेकडी व नाला असणे, गट नंबरमध्ये पोटहिस्से नसताना पोटहिश्श्याचे ७/१२ उतारे सादर करण्याबाबत अशा अनावश्यक व चुकीच्या त्रुटी काढून तहसिलदार, मुक्ताईनगर यांना परत पाठविले होते. तहसिलदार, मुक्ताईनगर यांनी सदरच्या प्रस्तावांमधील त्रुटीची पूर्तता करुन पुन:श्च सदर प्रस्ताव उप अधीक्षक भूमी अभिलेख, मुक्ताईनगर यांच्याकडे पाठविले.

जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, जळगाव यांनी उप अधीक्षक भूमी अभिलेख, पाचोरा व अन्य तालुक्यांचे कर्मचारी यांचे पथक नेमून सदर पथकामार्फत मूळ सर्व्हे अभिलेखावरुन सदर ५६३ प्रस्तावांची पडताळणी करण्यात आली आहे. सदर पडताळणीअंती ५६३ प्रस्तावांपैकी १२१ प्रकरणांमध्ये पोटखराब वर्ग (अ) मधील क्षेत्र लागवडीखाली आणल्याने त्यामध्ये सुधारित आकारणी ठरविण्यात आलेली आहे. तसेच पोटखराब (ब) वर्ग क्षेत्र असलेली ४३३ प्रकरणे अपात्र ठरविण्यात आली असून उर्वरित ०९ प्रकरणांमध्ये त्रुटी असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यास अनुसरुन उक्त ५६३ प्रकरणे दिनांक १८/०७/२०२३ रोजी उप अधीक्षक भूमी अभिलेख, मुक्ताईनगर यांनी तहसिलदार, मुक्ताईनगर यांचेकडे पाठविली आहेत.

पोटखराब वर्ग (अ) मधील क्षेत्र लागवडीखाली आणल्याने सुधारीत आकारणी ठरविण्यात आलेल्या १२१ प्रकरणांमध्ये तहसिलदार, मुक्ताईनगर यांचेकडून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

अनावश्यक व चुकीच्या त्रुट्या काढल्याबाबत तत्कालिन उप अधीक्षक, भूमी अभिलेख व मुख्यालय सहायक, भूमी अभिलेख कार्यालय, मुक्ताईनगर यांना दिनांक १२/०७/२०२३ रोजी कारणे दाखवा नोटीस देवून जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, जळगाव यांच्या दिनांक १९/०७/२०२३ रोजीच्या आदेशान्वये त्यांच्याविरोधात शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) अशी बाब नाही.

-----------------

## मुल (जि.चंद्रपूर) तालुक्यातील यशवंतराव चव्हाण मुक्त घरकुल योजनेंतर्गतच्या लाभार्थ्यांना अनुदान मिळण्याबाबत

**(११) * २०४७३ श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विमुक्त जाती व भटक्या जमाती या प्रवर्गातील कुटुंबाचे राहणीमान उंचावणे, त्यांच्या उत्पन्नाचे स्रोत वाढून त्यांना स्थिरता प्रदान करणे, विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाला विकासाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील नागरिकांना यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत घर बांधण्यासाठी जागा व निधी उपलब्ध करून देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुल (जि.चंद्रपूर) तालुक्यात सन २०१९ पासून सदर योजनेंतर्गत एकूण १९५४ घरकुल लाभार्थ्यांना अनुदानाची रक्कम अद्याप मिळाली नसल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेंतर्गत घरकुल लाभार्थ्यांना अनुदान त्वरित देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) हे अंशत: खरे आहे.

ग्रामीण भागातील विमुक्त जाती, भटक्या जमाती प्रवर्गातील घटकांना वैयक्तिक तसेच सामुहिकरित्या घरकुलांचा लाभ देण्यासाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना राबविण्यात येते.

सदरहू योजनेंतर्गत ज्या लाभार्थ्यांकडे स्वत:ची जागा आहे असे लाभार्थी केवळ वैयक्तिक लाभास पात्र आहेत. तसेच, ज्या लाभार्थ्यांकडे स्वत:ची जागा नाही अशा लाभार्थ्यांना शासकीय जमिनीवर अथवा शासकीय जमीन उपलब्ध नसल्यास खाजगी जमीन खरेदी करुन वसाहत निर्मितीद्वारे योजनेंतर्गत सामुहिकरित्या लाभ देण्यात येतो.

सदरहू योजनेंतर्गत वैयक्तिक/ सामुहिक घरकुल लाभार्थ्यांसाठी सर्वसाधारण क्षेत्राकरीता रुपये १.२० लक्ष व प्रशासकीय निधी रुपये ४८००/- तसेच डोंगराळ/दुर्गम क्षेत्राकरीता रुपये १.३० लक्ष व प्रशासकीय निधी रुपये ५२००/- इतका निधी अनुज्ञेय आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत शासन निर्णय, दिनांक ०८/०२/२०२३ अन्वये चंद्रपूर जिल्ह्यातील २८०३ वैयक्तिक घरकुल लाभार्थ्यांना व त्याकरीता रुपये ३४,९८,१४,४००/- इतक्या निधीस मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये मुल तालुक्यातील १९५४ वैयक्तिक घरकुल लाभार्थ्यांचा समावेश आहे. सदरहू घरकुलांसाठी शासन निर्णय दिनांक ०८/०२/२०२३ अन्वये रुपये २.०० कोटी, शासन ज्ञापन दिनांक ३१/०३/२०२३ अन्वये रुपये ५.०० कोटी व शासन ज्ञापन दिनांक १४/०७/२०२३ अन्वये रुपये ७.०० कोटी असा एकूण रुपये १४.०० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. उर्वरित निधी उपलब्धतेनुसार देण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अहेरी (जि.गडचिरोली) उपविभागातील तेंदूपत्त्यांचे कोट्यवधी रुपयांची रक्कम थकीत असल्याबाबत

**(१२) * २०५६१ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहेरी (जि.गडचिरोली) उपविभागातील अहेरी, मुलचेरा, सिरोंचा, भामरागड, एटापल्ली तालुक्यातील आदिवासी व बिगर आदिवासी नागरिकांना तेंदूपत्ता हंगामात कमी वेळेत जास्त पैसा कमावण्याची संधी असूनही या तेंदूपत्त्याचे कोट्यवधी रुपयाची रक्कम थकीत असल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील चार ते पाच वर्षांपासून तेंदूपत्त्याची कोट्यवधी रुपयाची थकीत रक्कम मजुरांना न मिळाल्याने मजुर मोठ्या आर्थिक अडचणीत आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, थकीत तेंदूपत्त्यांची देणी देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) भ्रष्टाचार निवारण समिती, महाराष्ट्र शाखा गडचिरोली यांनी दिनांक २२/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये तक्रार दाखल केली. सदर तक्रारीची चौकशी करण्याच्या अनुषंगाने उपवनसंरक्षक यांनी तक्रारीमध्ये नमूद गावांची नावे पेसा अंतर्गत ग्रामसभा तेंदू लिलाव पर्याय-२ ची असून पेसा पर्याय-२ चे तेंदू घटकांची विक्री ही ग्रामसभा हे स्वबळावर करतात. त्यावर नियंत्रण मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली यांचे असते. ग्रामविकास विभाग मंत्रालय हे या संदर्भात मध्यवर्ती यंत्रणा आहे.

अहेरी (जि.गडचिरोली) उपविभागातील अहेरी, मुलचेरा, चामोर्शी तालुक्यात बिगर अनुसूचित क्षेत्राबाहेरील (नॉन पेसा) १७ तेंदू घटक आहेत. त्याचे व्यवस्थापन वनविभागामार्फत केले जाते. मागील चार वर्षांपासून त्यात कोणत्याही प्रकारे तेंदूपत्याची मजुरीची रक्कम मजुरांना अदा करण्यात आली आहे.

पेसा पर्याय-१ मध्ये मागील ४ वर्षात फक्त २०२० च्या हंगामात मुलचेरा तालुक्यात एक घटक (४ गावे), भामरागड तालुक्यात एक घटक (३ गावे) व सिरोंचा तालुक्यात एक घटक (२ गावे) असे एकूण तीन घटकाचे विक्री वन विभागामार्फत झाली. त्याचे संपूर्ण रॉयल्टी व मजुरीची रक्कम मजुरांना अदा करणेसाठी थकीत राहिलेली नाही.

(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईत अत्याधुनिक चित्रपटसृष्टी उभारण्याबाबत

**(१३) * २०५९१ श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक १८५८६ ला दिनांक २३ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील ५२१ एकर जागेवर अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेली चित्रनगरी (फिल्मसिटी) उभारण्यात येणार असल्याबाबत मा.सांस्कृतिक कार्यमंत्री व मा.पर्यटन मंत्री यांनी जाहीर केले असल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई विमानतळावर येणाऱ्या पर्यटकांसाठी व्यवस्था विकसित करणे, मुंबई विमानतळाजवळील १०४ चौ.कि.मी. चा असलेला पार्क व त्यासोबत चित्रपटाच्या चित्रिकरणासाठी राज्यातील ६५ पर्यटनस्थळे सोयीसुविधांसह विकसित करणे शासनाच्या विचाराधीन असल्याचेही मा.मंत्री महोदयांनी घोषीत केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई येथे अत्याधुनिक चित्रनगरी (फिल्मसिटी) उभारण्याबाबत तसेच राज्यातील ६५ पर्यटन स्थळे विकसित करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित, दादासाहेब फाळके चित्रनगरी गोरेगाव, मुंबई या महामंडळास सन १९७७ मध्ये चित्रनगरीकरीता ५२१ एकर जमीन प्रदान केलेली असून, विविध योजनेतून चित्रनगरीच्या आधुनिकीकरणाची कार्यवाही सुरु आहे. सद्य:स्थितीत आधुनिक तंत्रज्ञान असलेली चित्रपटसृष्टी उभारण्याकरीता रुपये १०० कोटीचा निधी देण्यात आला असून, विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन निविदेची प्रक्रिया सुरु करण्यात येणार आहे.

(२) व (३) राज्यातील पर्यटनस्थळे (Eco Tourism Spots) बाबतची पुस्तिका व सॉफ्टकॉपी Maharashtra Eco Tourism Development Board, Nagpur (वन विभाग) यांच्याकडून महामंडळास प्राप्त झाली असून सदरची माहिती महामंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. निर्मिती संस्थांनी चित्रीकरणासाठी उपलब्ध जागांची मागणी केल्यास, वन विभागास कळविण्यात येईल. जेणेकरुन महाराष्ट्रातील विविध पर्यटन स्थळांवर चित्रीकरण होईल व त्याद्वारे रोजगार निर्मितीसह उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण होईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आमटेम (ता.पेण, जि.रायगड) येथील ग्रामपंचायतीत महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गतच्या कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१४) * २०६८५ श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आमटेम (ता.पेण, जि.रायगड) ग्रामपंचायत अंतर्गत मोठ्या प्रमाणात महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत विकास कामे सुरू असून क्षेत्रिय स्तरावर काम करणाऱ्या व्यक्ती व ज्याच्या नावे मजुरीचे अनुदान दिले जाते, त्या व्यक्ती वेगवेगळया असल्याचे तसेच कृषी सहाय्यक तसेच कनिष्ठ अभियंता हे संगनमत करून मग्रारोहयो योजनेत गैरव्यवहार करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आमटेम ग्रामपंचायतीच्या मग्रारोहयोच्या सर्व कामाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील विक्रोळीच्या कन्नमवार नगर परिसरामध्ये अवैध झोपडपट्टयांचे बांधकाम होत असल्याबाबत

**(१५) * २०७४८ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे अभयारण्य खाडी रोहित पक्षी (फ्लेंमिगो) क्षेत्रामध्ये विक्रोळीच्या कन्नमवार नगर परिसरात झोपड्यांची संख्या बेसुमार वाढत असून या झोपड्यांमुळे वन्यजीवांसह मासे इतर जैविकतेला धोका निर्माण झाला असल्याचे, माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या झोपडपट्टीमध्ये सक्रिय असलेले गुंड पोलिसांची आणि वन विभागाची भिती न बाळगता घरे उभारुन विकत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन येथील अवैध बांधकामे हटविण्याबाबत तेथील झोपडीदादांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) मौजे हरियाली, ता.कुर्ला न.भू.क्र. ३६३ पै. मधील ०.५३३५८ हे. क्षेत्र अधिसूचित राखीव वन | असून सदर क्षेत्रावर कोणतेही अतिक्रमण नाही.

तथापि, मौजे हरियाली, ता.कुर्ला येथील न.भू.क्र. ३६४ या शासकीय मिळकतीची पाहणी करण्यात आली असता, सदर ठिकाणी बांबू, लाकडे, पत्रे व प्लास्टीकच्या सहाय्याने खाडीच्या दलदल जमीनीवर भर टाकून कच्चे बांधकाम तसेच अंदाजित ५ ते ६ कच्च्या झोपड्या बंद, अर्धवट पडक्या आहेत. सदर अनधिकृत बांधकाम/ झोपड्या कांदळवन क्षेत्राच्या बाहेर परंतु बाहेरील ५० मी. बफर झोनच्या आत बांधले असल्याने संबंधितांविरुध्द पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ कलम १५(१)(२) नुसार एफआयआर ३०५९, दिनांक ०८/०७/२०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यात अवैधरित्या वाळू उपसा व वाहतूक होत असल्याबाबत

**(१६) * २०८१५ डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यात नदीपात्रातून सर्रास अवैधरित्या वाळू उत्खनन केले जात असून ट्रॅक्टरच्या सहाय्याने वाहतूक केली जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन अवैधरित्या वाळू उत्खनन व वाहतूक करणाऱ्या वाळू माफियांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२) व (३) कळमनुरी तालुक्यात अवैध वाळू वाहतूकीला आळा घालण्याचे दृष्टीने व वाळू माफीयांवर कार्यवाही करणेसाठी अधिकारी/कर्मचारी यांचे पथक तयार केले आहे. तसेच वाळूघाट असलेल्या गावात ग्रामदक्षता समितीची स्थापना केली आहे.

कळमनुरी तालुक्यात दिनांक ०१/०४/२०२३ ते ३०/०६/२०२३ या कालावधीत एकूण ०७ वाहनांवर कारवाई करून रुपये ८.७३ लक्ष दंडात्मक कारवाई केली आहे. त्यापैकी ०३ वाहन मालक यांच्यावर फौजदारी कारवाई केली आहे.

हिंगोली जिल्ह्यात दिनांक ०१/०४/२०२३ ते ३०/०६/२०२३ या कालावधीत अवैध उत्खनन व वाहतूक करणाऱ्या एकूण ४८ प्रकरणात रुपये २६.८२ लक्ष दंड वसूल करून शासन खाती जमा केला आहे. तसेच २७ वाहने जप्त करण्यात आली आहे.

-----------------

## नागपूर जिल्ह्यातील वृध्द कलावंत व साहित्यिकांना थकीत मानधन मिळण्याबाबत

**(१७) * २०८६१ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव : तारांकित प्रश्न क्रमांक १४६५४ ला दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) नागपूर जिल्ह्यातील वृध्द कलावंत व साहित्यिकांना सन २०१९-२० व २०२०-२१ या वर्षांचे थकीत मानधन मिळाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आणिबाणी काळातील लाभार्थ्यांना अडीच वर्षांचे थकीत निवृत्तीवेतन दिले त्याच धर्तीवर नागपूर जिल्ह्यातील वृध्द कलावंतांना व साहित्यिकांना दोन वर्षांचे थकीत मानधन त्वरीत देण्यात यावे, अशी मागणी सिनियर सिटीझन कौन्सिल ऑफ नागपूर डिस्ट्रिक्ट यांनी राज्य शासनाकडे अनेकदा केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) जिल्हा निवड समितीच्या जानेवारी, २०२२ मध्ये झालेल्या बैठकीत निवडलेल्या पात्र सन्मानार्थ्यांना जानेवारी, २०२२ पासून मानधन अदा करण्यात येत आहे.

(२) व (३) सिनियर सिटीझन कॉन्सिल ऑफ नागपूर डिस्ट्रिक्ट यांनी राज्य शासनाकडे थकीत मानधन त्वरित देण्याबाबत दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये मागणी केली आहे, ही वस्तुस्थिती आहे. मात्र, सन २०१९-२० व २०२०-२१ या वर्षातील लाभार्थ्यांची निवड जानेवारी, २०२२ मध्ये झाल्याने पात्र झालेल्या कलावंतांना माहे जानेवारी, २०२२ पासून नियमित मानधन अदा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता शैक्षणिक सत्र २०२३-२४ पासून स्वाधार योजना सुरू करण्याबाबत

**(१८) * २०८६३ श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इतर मागास प्रवर्गातील २१ हजार ६०० विद्यार्थ्यांना स्वाधार योजना सत्र २०२२-२३ पासून लागू करण्याची घोषणा राज्याचे मा.उप मुख्यमंत्री यांनी नागपूर येथे केली असून शैक्षणिक सत्र २०२२-२३ संपून २०२३-२४ सुरू होऊनही इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना स्वाधार योजना लागू करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शैक्षणिक सत्र २०२३-२४ पासून स्वाधार योजना सुरू करण्याबाबत तात्काळ शासन निर्णय निर्गमित करून अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) व (२) इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रति जिल्हा ६०० याप्रमाणे एकूण २१,६०० विद्यार्थी संख्येच्या मर्यादेत सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून आधार योजनेंतर्गत भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा स्वतः उपलब्ध करुन घेण्यासाठी निश्चित केल्यानुसार त्यांचे आधार क्रमांक संलग्न असलेल्या बँक खात्यात थेट रक्कम वितरीत करण्याची योजना प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती तथा फ्रिशीप लागू करण्याबाबत

**(१९)** * **२०८७९ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील इतर मागास व बहुजन कल्याण विभागाद्वारे दिनांक २१ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ६०५ अभ्यासक्रमांची यादी प्रसिध्द करण्यात आली असून ज्यांना शिष्यवृत्ती तथा फ्रिशीप लागु नाही असे बी.बी.ए., बी.सी.सी.ए., एम.सी.एम., पी.जी.डी.सी.सी.ए., कॉम्प्युटर सायन्स असे महत्वाचे अभ्यासक्रम ६०५ अभ्यासक्रमांच्या यादीतून वगळण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ६०५ अभ्यासक्रम अत्यंत महत्वाचे असल्याने शिष्यवृत्ती तथा फ्रिशीप या योजनेचा लाभ मिळत नसल्यामुळे बहुसंख्य ग्रामीण भागातील इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थी या शिक्षणापासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या सर्व अभ्यासक्रमांचा यादीत समावेश करून इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व फ्रिशीप उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१), (२) व (३) केंद्र शासनाच्या सन १९९८ च्या मार्गदर्शक सूचनांन्वये विहित केलेल्या अभ्यासक्रमाच्या गटानुसार एकूण ६०५ अभ्यासक्रमांना दिनांक २१/०८/२०१७ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सद्य:स्थितीत विजाभज, इमाव व विमाप्र विद्यार्थ्यांकरीता महाडीबीटी प्रणालीवर ७३२ अभ्यासक्रमांना शिष्यवृत्ती तथा फ्रिशीपचा लाभ देण्यात येत आहे.

इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडील शिष्यवृत्ती/ फ्रीशिपसाठी रोजगारान्मुख / तत्सम अभ्यासक्रमाची निश्चिती करण्याबाबत संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीच्या दिनांक २५/०७/२०२३ रोजी

झालेल्या बैठकीत ११४ अभ्यासक्रमांचा समावेश करण्याबाबत कार्यवाही सदर समितीच्या विचाराधीन आहे. त्यामध्ये बी.बी.ए., बी.सी.सी.ए., एम.सी.एम., पी.जी डी.सी.सी.ए., कंप्यूटर सायन्स या अभ्यासक्रमांचा समावेश असून सदर अभ्यासक्रमास शिष्यवृत्ती व फ्रिशिप लागू करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील ओबीसी विद्यार्थ्यांकरीता 'ज्ञानज्योती आधार योजना' राबविण्याबाबत

**(२०) * २०८९१ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता चालविल्या जाणाऱ्या ७२ वसतिगृहात बाहेरगावी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वर्षाला ८० हजार रुपये देणारी 'ज्ञानज्योती आधार योजना' सुरु करण्याबाबत मा.उपमुख्यमंत्री महोदयांनी केलेल्या घोषणेनुसार इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ७२ वसतिगृहे सुरू करण्यासंदर्भात शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामीण भागातील इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शहराच्या ठिकाणी राहण्याची व्यवस्था नसल्यामुळे त्यांना शिक्षण घेताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त शासन निर्णयानुसार सदरहू योजना शासनाने कार्यन्वित केली आहे काय, असल्यास योजनेचे थोडक्यात स्वरूप काय आहे, आजमितीपर्यंत किती इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी लाभ घेतला आहे,
(४) अद्यापपर्यंत सदरहू योजना अंमलात आली नसल्यास, इतर मागास प्रवर्गातील वसतिगृह लवकरात लवकर सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१), (२), (३) व (४) जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी राज्यातील इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील मॅट्रीकोत्तर व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासनाने स्वत: इमारत भाड्याने घेवून जिल्हानिहाय वसतिगृहे कार्यान्वित करण्याचा शासन निर्णय दिनांक २८/०२/२०२३ अन्वये घेण्यात आला आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

तसेच, इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रति जिल्हा ६०० याप्रमाणे एकूण २१,६०० विद्यार्थी संख्येच्या मर्यादेत आधार योजनेंतर्गत भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा स्वतः उपलब्ध करुन घेण्यासाठी निश्चित केल्यानुसार त्यांचे आधार क्रमांक संलग्न असलेल्या बँक खात्यात थेट रक्कम वितरीत करण्याची योजना प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबईतील स्वराज क्रशर स्टोन एल.एल.पी. कंपनीवर कारवाई करण्याबाबत

**(२१) * २०७५९ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील पनवेल, उरण महसूल क्षेत्रातील स्वराज क्रशर स्टोन एल.एल.पी. कंपनीने शासनाच्या परवानगी शिवाय दर ठरवून दगडखाणी चालकांची फसवणूक केली असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी पनवेल संघर्ष समितीने त्याबाबत वेळोवेळी तक्रारी करुनही त्याकडे संबंधित विभागाचे अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे स्थानिक व प्रकल्पग्रस्तांच्या व्यवसायांचे मालकी हक्कसुद्धा हिरावून घेण्याची भीती व्यक्त होऊ लागली आहे, हे ही खरेआहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने शासनाची फसवणूक करणाऱ्या स्वराज क्रशर स्टोन एल.एल.पी. कंपनीवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) प्रकरणी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक प्रकल्प संबंधित प्रकल्पग्रस्तांची लोकनेते दि.बा.पाटील २७ गाव प्रकल्पबाधित कृती समिती पनवेल यांनी दिनांक १५/०५/२०२३ रोजी तहसिलदार, पनवेल यांचेकडे व दिनांक १७/०५/२०२३ रोजी जिल्हाधिकारी, पनवेल यांच्याकडे निवेदन/ तक्रार दिले. यासंदर्भात जिल्हाधिकारी, रायगड यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १४/०६/२०२३ रोजी अपर जिल्हाधिकारी, रायगड, उपविभागीय अधिकारी, पनवेल, तहसिलदार, पनवेल, तहसिलदार, उरण, जिल्हा खनिकर्म अधिकारी, स्वराज्य स्टोन एल.एल.पी. कंपनीचे संचालक मंडळ तसेच सिडकोचे अधिकारी यांची बैठक घेण्यात आली आहे.

तसेच, श्री.कान्होबा दगड खाण व क्रशर मालक चालक सामाजिक संस्था स्वराज्य स्टोन एल.एल.पी. यांचे मध्ये दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२३ रोजी सामंजस्याने करार केला असून संस्था शासनाचे गौणखनिजाचे स्वामित्वधनाची रक्कम वेळोवेळी भरत असून त्यांची स्वराज्य स्टोन एल.एल.पी. विरुध्द कोणतीही तक्रार नसल्याचे दिसून आले आहे.

-----------------

## मौजे सजा-साकोरे (ता.नांदगाव, जि.नाशिक) येथील भूमिहीन शेतकऱ्यांच्या नावे जमीन होणेबाबत

**(२२) * १९९७० श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव (जि.नाशिक) तालुक्यातील मौजे सजा-साकोरे येथील जुना गट क्र.८०१ मधील गेले ४० वर्षांपासून जमीन कसून उपजीविका करीत असलेल्या भूमिहीन शेतकऱ्यांच्या नावे जमीन व्हावी याकरीता लढा देऊनही सदरहू जमीन वनविभागाचा ना-हरकत दाखला नसतानाही परस्पर टी.पी.सौर्य लि. कंपनीला

बोगस कागदपत्रांच्या आधारे विक्री केल्याचा प्रकार तसेच सदरहू जमीन एका राजकीय पदाधिकाऱ्यामार्फत नांदगावचे तहसिलदार यांनी संगनमताने बेकायदा हस्तांतरण करण्यात आल्याचे माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याविरोधात बाधित शेतकऱ्यांनी किसान सभेच्यावतीने अपर जिल्हाधिकाऱ्यांचे दालनाबाहेर ठिय्या आंदोलनही केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन १९६८ पासून जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या नावे जमीन होण्याबाबत गेले १५ वर्षांपासून लढा देत असताना शासनाने शेतकऱ्यांना न्याय न देता माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये टी.पी.सौर्य लि. कंपनीला बोगस कागदपत्रे देऊन गरीब शेतकऱ्यांना बेदखल करण्यात आले असल्याची बाब मा.मुख्यमंत्री व मा.महसूल मंत्री महोदयांच्या लेखी निवेदनाद्वारे निदर्शनास आणून दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) खरे नाही.
(२) होय. हे अंशत: खरे आहे.
(३) सदर प्रकरणी लेखी निवेदन या कार्यासनास प्राप्त झालेले नाही.
(४) प्रस्तुत प्रकरणी विभागीय आयुक्त, नाशिक यांनी शासनाकडे मार्गदर्शन मागितले आहे व त्यावर शासन स्तरावर छाननी चालू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्हा निर्मितीनंतर जिल्हा पातळीवरील बहुतांश कार्यालये कार्यरत नसल्याबाबत

**(२३)** * **२०५७० श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हा निर्मितीनंतर जिल्हा पातळीवरील बहुतांश कार्यालये पालघर जिल्ह्यात कार्यरत नसल्याने नागरिकांना जिल्हा कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना पोहचत नसल्याने तेथील नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असल्याची बाब दिनांक १९ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जिल्हा पातळीवरील कार्यालये सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) पालघर जिल्हा अस्तित्वात आल्यानंतर आतापर्यंत पालघर जिल्ह्यात एकूण ५३ कार्यालये स्थापित होवून कार्यरत झालेली आहेत. तसेच ७ कार्यालये अद्याप पालघर जिल्ह्यात कार्यरत नाहीत. सदर कार्यालयांसाठी पालघर जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी जागा देण्यात

आलेली आहे त्यापैकी ३ कार्यालय पालघर येथे स्थापन करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य (मिलेट) वर्षा निमित्त कृषी विभागाने नियोजन केले नसल्याबाबत

**(२४) * २०६२८ श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य (मिलेट) वर्षानिमित्त राज्यात "महाराष्ट्र श्री अन्न अभियान" सुरू केले असून यंदाच्या खरिपात तृणधान्याच्या लागवडीखालील क्षेत्र वाढविणे, उत्पादकता वाढविणे अथवा उत्सव उत्पादन वाढविण्यासंदर्भात अर्थसंकल्पात २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात येऊनही कृषी विभागाने याबाबत काहीच नियोजन केले नसल्याची बाब माहे जून, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आलीआहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तृणधान्याची राज्यातील लागवडीखालील क्षेत्र उत्पादन व उत्पादकता वाढावी यासाठी कृषी विभागाने कोणता कार्यक्रम आखला आहे, तसेच इतर राज्यांप्रमाणे शालेय मुलांना दिल्या जाणाऱ्या मध्यान्ह भोजनात तृणधान्याचा (मिलेट) वापर करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(३)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) हे खरे नाही.

संयुक्त राष्ट्र संघाने २०२३ हे "आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष" म्हणून घोषित केले आहे. "आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष २०२३" राज्यामध्ये साजरे करण्यासाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद करण्यात आलेली नाही तर, विभागाच्या विविध योजनांच्या निधीतून या अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. दिनांक ०९ मार्च, २०२३ रोजी मा.उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी अर्थसंकल्पामध्ये, "महाराष्ट्र श्री अन्न (Millets) अभियान" घोषित केले आहे. या घोषणेच्या अनुषंगाने राज्यामध्ये महाराष्ट्र श्री अन्न (Millets) अभियान राबविण्यासाठी दिनांक १७ एप्रिल, २०२३ च्या शासन परिपत्रकान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. तसेच सदर शासन परिपत्रकान्वये या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी अन्न व पोषण सुरक्षा योजना, आत्मा योजना, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया व मुख्यमंत्री कृषी अन्न प्रक्रिया योजना, मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प या विभागाच्या योजनांच्या तरतुदीतून पौष्टिक तृणधान्याची उत्पादन वाढ, निविष्ठा, आहारातील वापर वाढ इत्यादी बाबींसाठी खर्च करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.
(२) कृषी विभागामार्फत राज्यात राष्ट्रीय अन्न व पोषण सुरक्षा अभियान ३१ जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत पौष्टिक तृणधान्य लागवडीसाठी पीक प्रात्याक्षिके, बियाणे वितरण, शेत तिथे पौष्टिक तृणधान्य मिनिकीट, बियाणे उत्पादन, एकात्मिक अन्न व किड व्यवस्थापन, ह्या बाबी राबवून शेतकऱ्यांना अनुदानावर बियाणे, जैविक खते व औषधे दिली जातात, तसेच शेतकरी प्रशिक्षणाच्या माध्यमातून पिकांचे लागवड तंत्रज्ञान पुरविले जाते.

यांव्यतिरिक्त आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षाच्या अनुषंगाने सन २०२२-२३ व २०२३-२४ मध्ये राष्ट्रीय कृषी विकास योजनेच्या अंतर्गत महाराष्ट्र मिलेट मिशन ३४ जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. महाराष्ट्र मिलेट मिशन अंतर्गत सुधारित तंत्रज्ञानावर आधारित पीक प्रात्याक्षिके, शेतीशाळा, प्रशिक्षण, कार्यशाळा, प्रदर्शन, रोड शो, कृषी महोत्सव व विविध माध्यमांद्वारे प्रसिद्धी इत्यादीद्वारे पौष्टिक तृणधान्याच्या उत्पादन वाढ व आहारातील वापर वाढविण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच शालेय शिक्षण व क्रीडा विभागामार्फत,

i) केंद्र पुरस्कृत प्रधान मंत्री पोषण शक्ती निर्माण (पूर्वीची शालेय पोषण आहार) योजनेची अंमलबजावणी करण्यात येते. प्रस्तुत योजनेतंर्गत राज्य व केंद्र शासनाच्या शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, खाजगी अनुदानित व अंशत: अनुदानित शाळांमधील इ. १ ली ते इ.८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यात येतो.

ii) सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी केंद्र शासनाच्या प्रकल्प मंजूरी मंडळाच्या बैठकीमध्ये राज्याचा वार्षिक कार्यक्रम अंदाजपत्रक व आराखडा सादर करताना विद्यार्थ्यांना आठवड्यातील एक दिवस पौष्टिक पोषण आहार देण्याच्या दृष्टीने तृणधान्याची मागणी केंद्र सरकारकडे नोंदविण्यात आली आहे. केंद्र शासनाकडून राज्यास तृणधान्य प्राप्त झाल्यास राज्यातील विद्यार्थ्यांना प्रस्तुत योजनेतंर्गत आठवड्यातील एक दिवसासाठी तृणधान्ययुक्त पौष्टिक पोषण आहार देण्याचे प्रस्तावित आहे.

iii) यासह, नागरी भागातील शाळांमध्ये बचत गटामार्फत आठवड्यातून एकदा राजगीरा लाडू/ फळ/ चिक्की/ खजूर इ. पदार्थाचा पुरक आहार देण्यात येतो.

iv) प्रस्तुत योजनेंतर्गत सद्य:स्थितीत तांदळापासून बनविलेल्या पाककृतीमध्ये सुधारणा करण्याच्या अनुषंगाने दिनांक १५ मार्च, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात दुसरे नवीन मेंढी व शेळी विकास महामंडळ स्थापन करण्याबाबत

**(२५) * १९६६७ प्रा.राम शिंदे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दुसरे नवीन मेंढी व शेळी विकास महामंडळ स्थापन होणार असून सहकार तत्वावरील या महामंडळाच्या मुख्यालयासाठी अहमदनगर जिल्ह्याचे नाव निश्चित झाल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास महामंडळ सहकार तत्वावर नसून केंद्र सरकारने मेष पालनासाठी देय केलेल्या रुपये दहा हजार कोटींसाठी सहकार तत्वाची अट घातल्याने या नव्या महामंडळाची स्थापना केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास महामंडळाला भाग भांडवलाच्या रूपात दिलेल्या रुपये शंभर कोटींपैकी ९० कोटी रुपयांचा निधीदेखील या नव्या महामंडळासाठी वळविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पुण्यश्लोक अहिल्यादेवी विकास महामंडळाच्या ९० कोटी रुपयांचा निधी नव्या महामंडळासाठी न वळवता नव्याने स्थापन होणाऱ्या मेंढी व शेळी विकास महामंडळाला वेगळा निधी देऊन सहकार तत्वावरील हे महामंडळ चालू करण्याची मागणी जनतेतून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय.
(२) होय.
(३), (४) व ५) नव्याने स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र मेंढी व शेळी सहकारी विकास महामंडळास पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाकडील निधी वळती न करता राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाकडून निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांच्या सातबारावरील बोजा कमी झाला नसल्याने शेतकरी कर्जमाफीच्या प्रतिक्षेत असल्याबाबत

**(२६) * २०७६४ श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतकऱ्यांना दोन वेळा कृषी पीक कर्जाच्या माफीचा लाभ झाला असूनही भूविकास तथा जिल्हा सहकारी कृषी ग्रामीण भूविकास बँकेकडून शेती घटकासाठी घेतलेल्या कर्जाची माफी अद्याप पूर्ण न झाल्याने अनेक शेतकऱ्यांच्या सात-बारा वरील ताण कमी झाला नसल्याने हे शेतकरी कर्जमुक्तीच्या प्रतीक्षेत असल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृषी कर्ज माफी नंतर भूविकास बँकेने दिलेल्या कृषीपूरक ट्रॅक्टर, पाईपलाईन, कृषी अवजारे यासह अन्य साधनांच्या खरेदीसाठी शेतकऱ्यांनी काढलेल्या कर्जाचा प्रश्न प्रलंबित असून भूविकास बँकेमधून काढलेली कर्जे शेतीसाठीच काढली असल्यामुळे कृषी पीक कर्ज माफीप्रमाणे ते कर्ज माफ व्हावीत अशी मागणी शेतकऱ्यांकडून होऊ लागली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भूविकास बँक अवसायानात निघाली असताना कर्मचाऱ्यांचे थकलेले वेतन शासनाने दिले मात्र शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा मुद्दा अद्याप प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, भूविकास बँकेतील शेतकऱ्यांच्या कर्जावरील ताण कमी करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) नाही.

(२), (३) व (४) राज्यातील २९ जिल्हा भूविकास बँकांकडील ३४७८८ कर्जदारांची थकीत कर्जाची रक्कम (व्याजासह) सुमारे रुपये ९६४.१५ कोटी दिनांक ०९/११/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये माफ करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने भूविकास बँकांच्या शेतकरी/ कर्जदार सभासदांनी ज्या प्रयोजनाकरीता कर्ज घेतले आहे ती सर्व कर्जे माफ करण्यात आलेली आहेत.

उपरोक्त कर्ज माफीच्या निर्णयाच्या अनुषंगाने संबंधित कर्जदार शेतकऱ्यांच्या शेतजमिनीवरील कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे तातडीने प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना संबंधितांना दिनांक ०३/०२/२०२३ रोजीच्या अर्ध शासकीय पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार सद्य:स्थितीत ९१५० कर्जदार शेतकऱ्यांच्या जमिनीवरील कर्जाचा बोजा कमी करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात इतर मागास प्रवर्गांची जातनिहाय जनगणना करणेबाबत

**(२७) * २०७५४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात इतर मागास प्रवर्गांची संख्या ही ५२ टक्क्यांपेक्षाही जास्त असून स्वातंत्र्यापूर्वी जात निहाय जनगणना झाली होती, मात्र ओबीसींची जनगणना होत नसल्याने त्यांची निश्चित लोकसंख्या किती आहे याची माहिती मिळत नसल्यामुळे त्यांची शैक्षणिक, राजकीय आणि आर्थिक मागासलेपणा दूर करुन उपाययोजना करण्यासाठी ओबीसींच्या जातनिहाय जनगणनेच्या मागणीसाठी ओबीसी समाजाने अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर माहे ५ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास एक दिवसीय धरणे आंदोलन केले असून त्यांची मागणी मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा निवेदनातून दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इतर मागास बहुजन कल्याण प्रवर्गातील लोकसंख्येच्या प्रमाणात मराठा कुणबी समाजाचे इतर मागास प्रवर्गाबरोबर सर्वेक्षण होण्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर सर्व संघटनाना सुनावणीची संधी देऊन गुणवत्तेच्या आधारे निर्णय घेण्यात येणार आहे, हे ही खरेआहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी ओबीसींची जातनिहाय जनगणना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मराठा समाजाचे इतर मागास प्रवर्गाबरोबर सर्वेक्षण होण्याबाबत आयोगाकडे निवेदने प्राप्त झाली होती. त्यावेळी मराठा आरक्षणाबाबत पुनर्विलोकन याचिका दाखल झाल्याने मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर राज्य मागासवर्ग आयोगाने सर्व संघटनांना सुनावणीची संधी देऊन गुणवत्तेच्या आधारे निर्णय घेण्याबाबतचा निर्णय घेतला आहे.

(३) दिनांक ०८ जानेवारी, २०२० रोजी मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी सन २०२१ च्या सार्वत्रिक जनगणनेमध्ये मागास प्रवर्गातील लोकसंख्येची जातीनिहाय जनगणना करण्याची शिफारस या विषयाबाबत मांडलेला ठराव दिनांक ०८ जानेवारी, २०२० रोजी सभागृहात चर्चा होऊन एकमताने संगत करण्यात आला. सदर ठराव पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सह संचालक, महारजिस्ट्रार व जनगणना आयुक्त कार्यालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना कार्यवाहीकरीता पाठविण्यात आला असून त्याबाबत केलेली कार्यवाही महाराष्ट्र शासनास कळविण्याबाबत पाठपुरावा सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील वैध आणि अवैध सावकारांविरुध्द तक्रार करण्याकरीता सुलभ प्रक्रिया उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२८) * २०७०३ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावकारांच्या पिळवणूकीला निर्बंध घालण्यासाठी राज्य शासनाने दिनांक १६ जानेवारी, २०१४ रोजी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ हा कायदा संपूर्ण राज्यभरात लागू केला असतानाही अनेक शेतकरी खाजगी सावकारांकडून कर्ज घेत असल्याची गंभीर बाब दिनांक ३ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात सावकारांकडून सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक पिळवणूक सुरु असून देखील त्यांच्याविरुध्द शासनाकडे तक्रार दाखल करण्याचे प्रमाण नगण्य आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि राज्यातील वैध आणि अवैध सावकारांकडून सुरु असलेल्या आर्थिक शोषणाबाबत सर्वसामान्य नागरिकांना तक्रार करण्यासाठी सहज व सुलभ प्रक्रिया उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

सावकारांकडून होणाऱ्या कर्जदार शेतकऱ्यांच्या पिळवणुकीस प्रतिबंध करण्यासाठी समुचित व कठोर उपाययोजना करण्यासाठी दिनांक १६/०१/२०१४ पासून महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियमन, २०१४ राज्यात लागू करण्यात आलेला आहे.

३१ मार्च, २०२३ अखेर राज्यात परवानाधारक सावकारांची एकूण संख्या ११५२० असून शेतीविषयक २७२ कर्जदारांना रुपये ६४.६० लाख तर ६,५५,१६८ बिगरशेती कर्जदारांना रुपये १०८४.०७ कोटी असे एकूण ६,५५,४४० कर्जदारांना रुपये १०८४.७१ कोटी इतक्या रकमेचे कर्ज वाटप करण्यात आलेले आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

राज्यात सावकारी कायदा अंमलात आल्यापासून मार्च, २०२३ अखेर अवैध सावकारी बाबत ९३५८ तक्रारी प्राप्त झालेल्या असून एकूण ९०७ प्रकरणांमध्ये महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम,

२०१४ मधील कलम १८(२) अन्वये आदेश पारित करुन ४९८.९७ हेक्टर जमीन परत करण्यात आली आहे. तसेच एकूण ४९५ प्रकरणात गुन्हे दाखल झालेले आहेत.

राज्यातील नागरिक वैध आणि अवैध सावकारीबाबत सहाय्यक निबंधक, जिल्हा उपनिबंधक, विभागीय सहनिबंधक व राज्यस्तरावर सहकार आयुक्त व निबंधक कार्यालयांकडे तसेच थेट शासनाकडेही तक्रार अर्ज दाखल करु शकतात. अवैध सावकारी विरुध्द कारवाई करण्यासाठी व सावकारी कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने दिनांक ०१/०३/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये, प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली त्रिस्तरीय समिती गठीत केलेली आहे. सदर समितीमार्फत अवैध सावकारी संदर्भात करण्यात आलेल्या कारवाईचा नियमीतपणे आढावा घेण्यात येतो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## किराट (जि.पालघर) येथील मुंबई-वडोदरा द्रुतगती महामार्ग प्रकल्पासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीमध्ये बनावट कागदपत्रे सादर करुन फसवणूक केल्याबाबत

**(२९) * २०८०५ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किराट (जि.पालघर) येथील सर्व्हे क्र.३३५ मधील ९८३५ चौ.मी. व सर्व्हे क्र. ३३८ मधील २२४४ चौ.मी. जागा मुंबई-वडोदरा द्रुतगती महामार्गासाठी संपादित करण्यात आली असून या संपादित जमिनीचे खोटे कागदपत्रे सादर करुन शासनाच्या कोट्यवधी रुपयाची फसवणूक होत असल्याची बाब माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्ह्यातील स्थानिक दलालांच्या मदतीने तेथील स्थानिक अधिकारी व कर्मचारी हे काही नागरिकांच्या जमिनीच्या मोबदल्यात जास्तीची रक्कम मिळण्यासाठी जमिनीच्या चुकीच्या नोंदी करत असल्याबाबतची तक्रार जिल्हाधिकारी, पालघर व उप विभागीय अधिकारी यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी व कर्मचारी कोणती कारवाई केली तसेच जास्तीची अदा करण्यात आलेली रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) मौजे किराट, ता.जि.पालघर येथील सर्व्हे नं.३३५ व ३३८ मधील खाजगी जमिनी मुंबई-वडोदरा द्रुतगती महामार्गासाठी संपादित करण्यात येत आहे. या जमिनीच्या संपादन प्रक्रीयेवेळी गैरव्यवहार होत असल्याबाबत स्थानिक नागरीकांची जिल्हाधिकारी, पालघर आणि उप विभागीय अधिकारी, पालघर यांचेकडे दिनांक ०८/०५/२०२३ रोजी तक्रार प्राप्त झाली आहे. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, पालघर यांनी सखोल चौकशी करण्याकरीता अतिरीक्त जिल्हाधिकारी, पालघर यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत केली आहे. सदर चौकशी समिती मार्फत चौकशी चालु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आदिवासी समाजाचे बोगस प्रमाणपत्र धारक अधिकारी/कर्मचारी यांना नियमित पदस्थापना देणाऱ्यांची एस.आय.टी. मार्फत चौकशी होणे बाबत

**(३०) * २०५२३ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या अनुषंगाने आदिवासी समाजाचे बोगस प्रमाणपत्र प्राप्त करून शासन सेवेत दाखल झालेल्या कर्मचारी, अधिकाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करण्याऐवजी महसूल विभागात शासन सेवेत ठेवून नियमित पदावर पदस्थापना देण्यात आल्याचे तसेच सदर अधिकारी/कर्मचारी यांनी केलेला भ्रष्टाचार सिध्द झाल्याचे मा.लोकप्रतिनिधी यांनी हिवाळी अधिवेशन, २०२२ व अर्थसंकल्पीय अधिवेशन, २०२३ दरम्यान शासनाच्या निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महसूल विभागात बोगस जात पडताळणी प्रमाणपत्र असलेल्या व पुरवठा विभागाशी निगडित एका प्रकरणात भ्रष्टाचाराचे आरोप सिध्द झालेल्या एका अधिकाऱ्यावर मा.उच्च न्यायालयाने गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले असतानादेखील सदर अधिकाऱ्यास दिनांक २२ मे, २०२३ रोजी पुन्हा उपविभागीय अधिकारी या नियमित पदावर पदस्थापना देण्यात आली आहे, तसेच आस्थापना विभागाशी निगडित सहसचिव (महसूल) हे त्याच विभागात दीर्घ काळापासून म्हणजेच सुमारे १०-११ वर्षांपासून कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बाब मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधी असून याद्वारे मा.सर्वोच्च न्यायालयाचा अवमान होत आहे व संविधानाच्या तरतुदींशी विसंगत कृती होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशाप्रकारच्या पदस्थापना देणाऱ्यांची एस.आय.टी. मार्फत चौकशी व्हावी अशी मागणी मा.लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्य सचिव, मा.अति. मुख्य सचिव (सेवा), मा.अति. मुख्य सचिव (महसूल) यांचेकडे माहे जानेवारी, २०२३ पासून करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली, तसेच आदिवासी समाजाचे बोगस प्रमाणपत्र प्राप्त करून शासन सेवेत दाखल झालेल्या कर्मचारी व अधिकाऱ्यांवर मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या अनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) महाराष्ट्र विधानमंडळाचे हिवाळी अधिवेशन, २०२२ व अर्थसंकल्पीय अधिवेशन, २०२३ मध्ये यासंदर्भात मुद्दा उपस्थित करण्यात आला होता.

मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील क्र.८९२८/२०१५ व इतर याचिकांमध्ये दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २१/१२/२०१९ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार महसूल व वन विभागाच्या दिनांक २७/०१/२०२० च्या शासन निर्णयाअन्वये महसूली क्षेत्रिय संवर्गासाठी १२ अधिसंख्य पदे निर्माण करण्यात आली असून सदर पदांना वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली आहे. श्री.लतिफ पठाण, उप जिल्हाधिकारी यांच्या सेवा शासन आदेश दिनांक २२/०५/२०२३ अन्वये उप जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद या अधिसंख्य पदावर वर्ग करुन सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने उप विभागीय अधिकारी, सिल्लोड या पदावर पदस्थापना देण्यात आली आहे.

मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल फौजदारी रिट याचिका क्र.१६१/२०२१ मधील आदेशानुसार श्री.लतिफ पठाण, तत्का.जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली व इतर अधिकारी/कर्मचारी यांचेवर दिनांक १४/०३/२०२३ रोजी पोलीस स्टेशन, सेनगांव, जि.हिंगोली येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी सेनगांव तालुक्यातील एपीएल शेतकरी योजनेतील धान्य वितरण होत असलेल्या गैरव्यवहाराशी संबंधित श्री.पठाण तत्का.जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली व इतर अधिकारी/कर्मचारी यांची संयुक्त विभागीय चौकशी सुरु आहे.

-----------------

## महसूल विभागातील तहसिलदार व उपजिल्हाधिकारी संवर्गातील बदल्या करताना नियमांचे उल्लंघन झाल्याबाबत

**(३१) * २०७०६ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महसूल विभागातील तहसिलदार व उपजिल्हाधिकारी संवर्गातील बदल्या करताना 'महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५' चे उल्लंघन झाल्याचा ठपका ठेवून मुदतपूर्व बदल्या केलेल्या पाच महसूल अधिकाऱ्यांच्या बदलीला मॅटने स्थगिती दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बदल्यांमध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद यांनी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक २३ जून, २०२३ रोजीच्या लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने सदरहू बदल्यांची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आणि सदरहू बदल्यांमध्ये गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) मा.विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद यांचे सन २०२३ मध्ये तहसिलदार व उपजिल्हाधिकारी संवर्गातील बदल्यांमध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबतचे दिनांक २०/०६/२०२३ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे. तथापि, तहसिलदार व उपजिल्हाधिकारी संवर्गात झालेल्या बदल्या महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतूदीनुसार सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेनुसार करण्यात आल्या असून काही बदल्या प्रकरणी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायधिकरणाने स्थगिती दिली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महानंद डेअरी, मुंबई मधील कर्मचाऱ्यांना गत तीन महिन्यांचे वेतन मिळाले नसल्याबाबत

**(३२) * २०६३० श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महानंद डेअरी, मुंबई मधील कर्मचाऱ्यांचे मागील तीन महिन्यांचे वेतन प्रलंबित असल्याचे तसेच स्वेच्छानिवृत्तीसाठी अर्ज दाखल केलेल्या ५३० कर्मचाऱ्यांना देण्यासाठी रुपये ११६ कोटी इतका निधीच उपलब्ध नसल्यामुळे सदर स्वेच्छानिवृत्ती योजना प्रलंबित असल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील सहकारी दूध संघाची शिखर संस्था असलेल्या महानंद डेअरीची दहा वर्षांपूर्वी आठ लाख लिटर असलेली दुधाची विक्री आज ७० हजार लिटरवर आल्याने डेअरीचे उत्पन्न कमी झाल्यामुळे कर्मचाऱ्यांचे वेतन, पुरवठादारांची देयके थकीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, डबघाईस आलेली महानंद डेअरी पूर्ण क्षमतेने चालविण्यासाठी तसेच दुध उत्पादन आणि विक्री वाढविण्याच्या दृष्टीने तसेच तीन महिन्यांपासून प्रलंबित असलेले वेतन कर्मचाऱ्यांना देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) महानंदाच्या खालावलेल्या वित्तीय स्थितीमुळे महानंदच्या कर्मचाऱ्यांचे एप्रिल, मे व जून या महिन्याचे वेतन अदा करण्यात आलेले नाही. महासंघास उर्जितावस्था देण्यासाठी, तसेच वरकड खर्च कमी करण्याचा प्रयत्न म्हणून महासंघाची मनुष्यबळ संख्या कमी करण्यासाठी स्वेच्छानिवृत्ती योजना राबविण्याचे महासंघाने जाहीर केले आहे. सदर योजनेतंर्गत सुमारे ५३० अधिकारी/ कर्मचारी/ कामगार यांनी स्वेच्छानिवृत्तीसाठी अर्ज केला आहे. सदर योजनेस सुमारे रुपये ११६ कोटी इतक्या निधीची आवश्यकता असून, याबाबत महासंघाचे व्यवस्थापन, कर्मचारी संघटना व शासनस्तरावर चर्चा सुरू आहे.
(२) हे खरे आहे. महासंघाच्या उपविधीनुसार महासंघाच्या सदस्य संघांनी त्यांच्या एकूण संकलनाच्या ५ टक्के दूध पुरवठा महासंघास करणे आवश्यक आहे. तथापि, सदर दूध पुरवठा हा अनियमित स्वरूपाचा असतो. याचा विपरीत परिणाम महासंघाच्या दुध विक्री व्यवस्थेवर झाला आहे. तसेच महासंघांच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनापोटी दरमहा सुमारे रुपये ४.२५ कोटीचा आर्थिक भार महासंघावर पडत असून, त्यामुळे वरकड खर्चात वाढ होऊन त्याचा विपरीत परिणाम नफ्यावर होत आहे.
(३) व (४) शासनाने दूध महासंघाचे बळकटीकरण व आधुनिकीकरण करण्यासाठी महासंघास दूध भुकटी व बटरच्या स्वरूपात सुमारे रुपये ७० कोटी इतका निधी उपलब्ध करून दिला आहे. सदर निधीतून सुमारे रुपये २० कोटी इतका निधी महासंघाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी उपलब्ध करून दिला आहे. तसेच महासंघाच्या प्रकल्पांची कार्यक्षमतेचा पुरेपुर वापर होण्यासाठी शासनाच्या आरे दुधाच्या ब्रॅण्डचे पॅकींग महासंघाच्या युनिटमध्ये करून रॉयल्टी तत्त्वावर विक्री करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१)(कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.